आनंदीबाई कर्वे प्राथमिक शाळा, कर्वेनगर, पुणे-५२.

<u>वार्षिक तपासणी सन ६८-६९</u>

आनंदीबाई कर्वे प्राथमिक शाळा, कर्वेनगर ही "प्रॅक्टीसिंग स्कूल" (सराव शाळा) ही स्वातंत्र्यपूर्व काळातील एकमेव संस्था पार्वतीबाई अध्यापिका विद्यालयास संलग्न अशी संस्था आहे. तीची स्थापना १८४४ साली झालेली आहे.

महर्षि आण्णासाहेब कर्वे या थोर समाजसुधारकांनी स्त्री उन्नतीच्या व स्त्री सुधारण्यासाठी या शालेय संस्थेची सुरवात केली. आता पुण्यातील एक शैक्षणिक परीसरातील ही एक नामवंत संस्था आहे. तिची वार्षिक तपासणी मा. शिक्षणाधिकारी साहेब यांचे आदेशानुसार श्री. ढमढेकर व श्री. गानू. शिक्षण विस्तार अधिकारी यांनी दि. ५.१.६९ ला घेतली.

या संस्थेची इमारत प्रशस्त, प्रकाशशीर, हवेशीर आहे. सदर परिसर रम्य व उत्साहदायी वाटला.

इ. १ ते ७ चे ७ वर्ग असून शिक्षिकांची संख्या ९ असून इ. १ ते ४ पर्यंत ५ शिक्षिका व इ. ५ वी ७ साठी ४ (विषयवारी) शिक्षिका आहेत. त्यापैकी सौ. प्रतिभा नातू यांना अद्याप मान्यता आली नाही. त्यासाठी पत्रव्यवहार सुरू आहे. सर्व शिक्षिका प्रशिक्षित आहेत.

विद्यार्थिनी १ ते ४ पर्यंत याच परिसरातील आहेत. पण इ.५ ते ७ वी मधील काही विद्यार्थिनी कोर्ट कमिटेड आहेत. विद्यार्थिनी शिस्तप्रीय, गणवेशधारी व आज्ञाधारक दिसून आल्या.

शालेय अभ्यासक्रमातील इयत्तावार बाबीखालील प्रमाणे आढळून आल्या.

-प्रत्येक वर्गाच्या बाबतीत विषयवार सूचना लॉगबुकात दिलेल्या आहेत. त्याची पूर्तता करावी. पण सर्व साधारण इयत्ता १ लीच्या वर्गाची तयारी फारच चांगली दिसून आली. लेखन, वाचन, अंकज्ञान, आंकाचा लहान मोठेपणा, गाणी गोष्टी या बाबींचे आकलन चांगले झालेले दिसून आले. इ. २ री-वाचन, लेखन चांगले, गणित- दोन अंकी वजाबाकी सराव करून घेणे इष्ट.
इ. ३ री- लेखन वाचन, पद्य पाठांतर चांगले, विविध परिमाणाची ओळख चांगली. फक्त गुणाकाराचा संबोध घटवून घ्यावा. इ. ४ थी- भाषा, इतिहास, भूगोल, सा. ज्ञान चांगले. गणितातील संख्या वाचन, लेखन भागावर अधिक भर देणे आवश्यक. इ.५ वी मधील मुली अबोल वाटल्या. वर्गात ३-४ च मुले उत्तरे देण्याचा प्रयत्न करीत होते. लेखन विशेषत: शुध्दलेखनावर भर देणे जरूरीचे. इ. ६ वी - इंग्रजी चांगले, गणित-दशांश, अपूर्णांक भाग घटवून घ्यावा. इतर विषय चांगले. इंग्रजी स्पेलिंग तयारी व्हावी. इतिहास, भूगोल, सा. विज्ञान तयारी ठीक.

रेकॉर्ड :- जनरल रजिस्टर, कीर्द, खातावणी अद्ययावत आहेत. आवक जावक बारनिशी दि. १.१.८९ ला दाखविली. सेवा पुस्तके ४ शिक्षकेची आहेत. व अद्याप ५ शिक्षकांची सेवा पुस्तके भरलेली नाहीत. या सर्व बाबींची पूर्तता ५.२.८९ पर्यंत करून अहवाल सादर करावा.

शालेय प्रार्थना, परिपाठ, सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यीकरण, संवाद या बाबी उल्लेखनीय आहेत. शालेय शिस्त, स्वच्छता, एकसंघ काम करण्याची वृत्ती चांगली. क्रिडा स्पर्धा, विविध उपक्रम, भरतकाम, कागदकाम चांगले. राष्ट्रीय शैक्षणिक दृष्टिकोन जोपासण्याचा प्रय न स्तुत्य वाटला.

**<u>सामान्य सूचना</u>**

१) सेवा पुस्तिका पूर्ण भरून अहवाल ५.२.८९ पूर्वी पाठवावा.

२) शैक्षणिक साधनांचा वापर केला जातो. इंग्रजी विषयाचे बाबतीत तो भाग अधिक प्रमाणात करून घोटवून घ्यावा.

३) इ. ५ ते ७ वी गृहपाठांतील चुकांचे अनुधावन होणे जरूरीचे आहे.

एकंदरीत शालेय शिस्त, स्वच्छता, टापटिप, सामंजस्य या बाबतीत शैक्षणिक दर्जा चांगला आढळून आला.

शिक्षण विस्तार अधिकारी
(माध्यमिक) जि. प. पुणे

Deputy Education Officer,
Zilla Parishad. Pune-1

COUNTERSIGNED.

Education Officer,
Poona Zilla Parishad. Poona